Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

१९/२०२५

**विषय :- विद्यापीठाच्या अथवा अन्य संस्थांच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांना शैक्षणिक वर्ष सन २०२५-२०२६ मध्ये प्रवेश घेण्याकरिता परवानगीबाबत..**

विद्यापीठातील प्रशासकीय अधिकारी व सेवकांना स्वत:ची शैक्षणिक पात्रता वाढविण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या अथवा मान्यताप्राप्त अन्य संस्थांच्या परीक्षेस **बहि:स्थ/नियमित** विद्यार्थी म्हणून प्रवेश घेण्यास/परीक्षा देण्यास संबधितांनी कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष सन २०२५-२०२६ करिता ज्यांना परीक्षेस बसावयाचे असेल त्यांनी सोबतचा विहित नमूनामधील अर्ज विभाग प्रमुखयांच्या स्पष्ट शिफारशीसह **दि.३१ मे, २०२५** रोजी पर्यंत आस्थापना विभागात द्यावेत. संबधितांना सदर परवानगीमुळे कार्यालयीन वेळेत व नेमून दिलेल्या कार्यालयीन कामकाजावर कोणताही परिणाम होणार नाही. तसेच, परीक्षेस बसण्यास कोणत्याही प्रकारची विशेष सवलत दिली जाणार नाही. या प्रमुख अटीवर परवानगी देण्याचा विचार केला जाईल.

नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेताना अभ्यासक्रमाची वेळ व उपस्थितीचे प्रमाण इ. बाबी नमूद करणे आवश्यक आहे. तसेच, गतवर्षी ज्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी दिलेली आहे. त्यांनी निकालाची प्रत सोबत जोडावी. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची संबधितानी नोंद घ्यावी.

आदेशान्वये,

**कुलसचिव**

**जा. क्र. आस्थापना /** १०१०

**दिनांक :-** 13 MAY 2025

**प्रत -**

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, चिफ रेक्टर व रेक्टर, व सेवक

२. मा.कुलगुरु,मा.प्र-कुलगुरु,मा.कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा.संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.-

**विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी/सेवक यांच्या निदर्शनास आणावे.**

Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परीक्षेस बसण्याकरिताचा अर्ज

दि.    /    /२०२५

प्रति,
मा. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

**विषय — परीक्षेस बसण्यास परवानगी मिळणेबाबत...**

महोदय,

आस्थापना विभागाच्या संदर्भ परिपत्रक क्र. आस्थापना/            दि.             नुसार मी खालील दर्शविलेल्या परीक्षेस बसण्यासाठी अर्ज सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अधिकारी/कर्मचाऱ्याचे संपूर्ण नाव | ______________________ |
| २ | पदनाम | ______________________ |
| ३ | विभाग/अधिविभाग | ______________________ |
| ४ | नेमणूक (कायम/तात्पुरती) | ______________________ |
| ५ | सेवा कायम दिनांक | ______________________ |
| ६ | अभ्यासक्रम/परीक्षेचे नाव/वर्ष | ______________________ |
| ७ | विद्यापीठाचे/संस्थेचे नाव | ______________________ |
| ८ | परीक्षेचे स्वरूप (अर्धवेळ/बहि:स्थ/पोस्टल/नियमित/इतर)<br>**नियमित असल्यास वेळ नमूद करावी** | ______________________ |
| ९ | मागील वर्षी परवानगी दिलेलया परीक्षेचे नाव | ______________________ |
| १० | परीक्षा दिली होती काय? नसल्यास कारण नमूद करावे | ______________________ |
| ११ | सदर परीक्षेस उत्तीर्ण होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची संख्या | ______________________ |
| १२ | सदर प्रयत्नांचे परिणाम (उत्तीर्ण/अनुत्तीर्ण) | ______________________ |

**अर्जदाराची स्वाक्षरी**

**विभागप्रमुखांची शिफारस**